R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : २२

दि. ३१ डिसेंबर २०२५, वार :बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## जयगड बंदरातून काजू निर्यातीसाठीची प्रक्रिया गतीने पूर्ण करा - मंत्री नितेश राणे

मुंबई : रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड बंदरातून काजू आणि इतर कृषी उत्पादनांच्या निर्यातीची प्रक्रिया गतीने पूर्ण करावी, अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या. याविषयी मंत्रालयात आयोजित बैठकीवेळी ते बोलत होते.

बैठकीस महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, मित्राचे सल्लागार परशराम पाटील यांच्यासह जेएसडब्ल्यू ग्रुपचे प्रतिनिधी उपस्थित होते.




निर्यात प्रक्रिया सुरू करण्यासाठी लागणारी सर्व मदत विभाग करेल असे सांगून मंत्री राणे म्हणाले की, कोकणातील उत्पादने लवकरात लवकर आणि सहज निर्यात होण्यासाठी ही प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. बंदराला जोडणी होण्यासाठी कोल्हापूर - वैभववाडी रेल्वे मार्गाचे काम गतीने हाती घेण्यात येत आहे. उत्पादन तपासणी प्रयोगशाळा १५ जानेवारीपर्यंत सुरू करावी. यंदाच्या हंगामात काजू जयगड बंदरातून निर्यात होण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी तयारी करावी. उत्पादकांमध्ये जागृतीसाठी कार्यशाळेचे आयोजन करावे, असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

## आपकी बार लातूरमध्ये ट्रिपल इंजिन सरकार - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर

लातूर/ प्रतिनिधी: लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत लातूरमध्ये ट्रिपल इंजिन सरकार येणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील काळात केलेल्या कामाच्या बळावर आम्ही मतदारांना सामोरे जाणार असून मनपावर भाजपाचा झेंडा फडकणार आहे, असा विश्र्वास माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला.

मनपा निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. ३०)अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता.लातूरमध्ये महायुती म्हणून लढण्यासंदर्भात चर्चा सुरू होत्या. त्या अनुषंगाने माध्यमांशी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की, केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकासकामे होत आहेत. त्यामुळे जनता भाजपाच्या पाठीशी आहे. महायुती संदर्भात विचारणा केली असता आ. निलंगेकर म्हणाले



की, तिन्ही पक्षांमध्ये महायुती म्हणून लढण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. तिघांनीही शेवटपर्यंत एकत्रित लढण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. राष्ट्रवादीच्या नेत्यांचीही हीच भूमिका होती.स्वतंत्र लढू असे आम्ही कधीही म्हटले नाही. युतीसाठी बैठका घेतल्या, चर्चा केली. जागा वाटपाचीही चर्चा झाली. राष्ट्रवादीच्या नेत्यांकडूनही नकार आला नाही परंतु राष्ट्रवादी मधील काँग्रेसच्या बी टीमने महायुतीत मिठाचा खडा टाकला.काँग्रेस स्वतःच्या बाजूने न खेळता विरोधकांच्या बाजूने खेळते.तोच प्रकार यावेळी घडल्याचे आ. निलंगेकर म्हणाले.

युतीसाठी शिवसेनेसोबतही सकारात्मक चर्चा झाली.अनेक प्रभागात भाजप व शिवसेनेमध्ये मैत्रीपूर्ण लढती होणार आहेत. रिपाई भाजपच्या सोबतच आहे,असे ते म्हणाले.

आ.निलंगेकर यांनी सांगितले की, उमेदवारांची यादी पक्षश्रेष्ठींनी फायनल केले आहे.आम्ही विकासाचे मुद्दे घेऊन जनतेपर्यंत जाणार आहोत. आम्ही आजपर्यंत काय कामे केली आणि पुढे काय करणार हे जनतेला पटवून सांगणार आहोत.ही लढाई निलंगेकर विरुद्ध देशमुख अशी नाही तर जनतेच्या हितासाठी, लातूरच्या हितासाठी आम्ही लढणार आहोत.या निवडणुकीत भाजपला ५० हून अधिक जागा मिळतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

## माणगाव, तळा व म्हसळा येथील आदिवासी लाभार्थ्यांसाठी घरकुलासाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करा - मंत्री आदिती तटकरे

मुंबई, : माणगाव, तळा व म्हसळा नगरपंचायत हद्दीतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना आदिवासी घरकुल योजना (शहरी) अंतर्गत घरकुले मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.




माणगाव, तळा व म्हसळा नगरपंचायत हद्दीतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीसंदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, माणगाव नगरपंचायतीमधील ४५, तळामधील ६९ आणि म्हसळा मधील ४० (जि. रायगड) नगरपंचायत क्षेत्रातील घरकुलापासून वंचित असलेल्या अनुसूचित जमातीच्या एकूण १५४ घरकुलांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत. या घरकुलासंदर्भातील निधी तसेच पात्र लाभार्थ्यांच्या मान्यतेसाठी करावयाची कार्यवाही कालमर्यादेत करावी.

प्रत्येक लाभार्थ्यास रुपये २.५० लाख प्रमाणे घरकुल अनुदान देण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावांचा विचार करून पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ प्रदान करण्यात यावा. या योजनेमुळे शहरी भागातील आदिवासी कुटुंबांना सुरक्षित निवाऱ्याचा लाभ मिळणार आहे.

बैठकीस आदिवासी विभागाचे सहसचिव मच्छिंद्र शेळके, अतिरिक्त आयुक्त गोपीचंद कदम, तळा तहसिलदार स्वाती पाटील, माणगाव उपनगराध्यक्षा रिया उभारे, आनंद यादव, लक्ष्मी जाधव, दिलीप जाधव, ड. उत्तम जाधव, नाना भुवड, जगदीश शिंदे, नागेश लोखंडे, किशोर शिंदे, परशुराम कदम, अलिम पल्लवकर, लक्ष्मण हिलम, विजय तांबे, शाहीद उके आदी उपस्थित होते.

## भादा येथील जिप कन्या शाळेसह विविध कामांना मंजुरी;भादा ग्रामस्थांच्या वतीने आ. कराड यांचे आभार व्यक्त

लातूर - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार



संघातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या दुमजली नवीन वर्ग खोल्या बांधकामास ९० लाखाचा निधी मंजूर केल्याबद्दल तसेच गावांतर्गत विविध कामे मंजूर केल्याबद्दल भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून भादा येथील ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील वर्षानुवर्ष विकास कामापासून कोसो दूर असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील रस्त्यांच्या विविध कामाबरोबरच शासनाच्या विविध योजनेतून गावांतर्गत अनेक विकास कामे मोठ्या प्रमाणात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झाली. या सर्व कामांना लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आणि भादा गावच्या विकासाला गती दिली. परवाच जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला या शाळेच्या जुन्या वर्ग खोल्या पाडून त्याच जागेवर दोन मजली नवीन सहा वर्ग खोल्या बांधणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, विद्युतीकरण यासह इतर नव्याने बांधकाम करण्यात यावे यासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी मंजूर केल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा भादा ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले आहे.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, प्रदेश भाजपाचे भागवत सोट, पद्माकर चिंचोलकर, मंडलाध्यक्ष उद्धव काळे, बालाजी शिंदे, रेवण पाटील, योगेश लटूरे, दीपक शिवलकर, प्रेम लटुरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. आ. कराड यांनी यावेळी उपस्थित भादा ग्रामस्था समवेत गावातील आणि परिसरातील विविध विकास कामाच्या अनुषंगाने चर्चा केली. भादा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची श्रेणीवाढ करून या आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करावे अशी मागणी केली असता आमदार महोदयांनी येत्या काळात निश्र्चितपणे यासंबंधी निर्णय होईल असे आश्र्वासन दिले.

यावेळी भादा गावातील अशोक स्वामी, हरिदास बनसोडे, किशन क्षिरसागर, रामविलास मानधने, शिवराम पाटील, बिभीषण पाटील, शिवाजी माळी, कल्याण पाटील, रामहरी पाटील, मन्मत पाटील, लक्ष्मण माळी, संजय बनसोडे, विश्र्वनाथ पाटील, महादेव पाटील, अर्जुन लटुरे, दयानंद पाटील, उमाकांत पाटील, श्रीपाद शिंदे, सचिन मुकडे, ज्ञानदेव उबाळे, रूपसेन डोलारे, हनुमंत गायकवाड, गोरख बनसोडे, वग्रसेन घोडके, सचिन शिवलकर, मोहन शिवलकर, अशोक घोडके, बाबुराव आगलावे, सोमनाथ गाडेकर, रघुनाथ गाडेकर, जयप्रकाश हजारे, विशाल महाडुळे, शिवांश पाटील, प्रशांत पाटील, दीपक मानधने, रघुनाथ बनसोडे, महादेव काजे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह अनेकांची उपस्थिती होती.

## दिव्यांगांच्या विशेष शाळांतील अतिरिक्त शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी सर्वसमावेशक कार्यपद्धती

मुंबई: राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा व कार्यशाळांमधील नोंदणी प्रमाणपत्र रद्द होणे, नूतनीकरण न करणे तसेच पटनिर्धारणानंतर विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी सर्वसमावेशक व एकसंध कार्यपद्धती निश्र्चित केली आहे, अशी माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव मुंढे म्हणाले, यापूर्वी विविध शासन निर्णय, परिपत्रके व शाळा संहितेतील तरतुदी विखुरलेल्या स्वरूपात असल्याने समायोजन प्रक्रियेस विलंब होत होता आणि त्यामुळे न्यायालयीन प्रकरणे वाढत होती. ही बाब लक्षात घेऊन आयुक्त, दिव्यांग कल्याण यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या अतिरिक्त संवर्ग कक्षामार्फत समायोजन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याचा निर्णय घेतला आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही खंड पडू नये, यासाठी समायोजनासाठी कालबद्ध कार्यपद्धती निश्र्चित केली आहे. या निर्णयामुळे समायोजन प्रक्रिया अधिक पारदर्शक होऊन शैक्षणिक सातत्य राखले जाणार असल्याचे सचिव मुंढे यांनी स्पष्ट केले आहे.

शासन मान्यताप्राप्त खासगी अनुदानित विशेष शाळा किंवा कार्यशाळेची मान्यता रद्द झाल्यानंतर अपिलास स्थगिती नसेल, तर आयुक्त, दिव्यांग कल्याण संबंधित उपक्रम तात्काळ बंद करतील. अशा वेळी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कायमस्वरूपी समायोजन होईपर्यंत त्यांना समान प्रकारच्या उपक्रमांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात हस्तांतरित करण्यात येईल. यासाठी जवळच्या शाळांची क्षमता तात्पुरती वाढवली जाईल.

शाळा संहितेनुसार विद्यार्थ्यांची पटनिर्धारण प्रक्रिया दरवर्षी १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असून, पटनिर्धारणानंतर अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांची यादी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात व त्यानंतर दर महिन्याला संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन एका महिन्यात पूर्ण करणे आवश्यक असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, समायोजन शक्यतो संबंधित जिल्ह्यात, अन्यथा लगतच्या किंवा इतर जिल्ह्यांमध्ये करण्यात येईल. आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या कर्मचाऱ्यांना समान वेतनश्रेणीतील समकक्ष पदावर नियुक्ती देण्यात येणार असून, प्रथम दिव्यांग कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. आदेशानंतर विहित कालमर्यादेत रुजू न झाल्यास शिस्तभंग कारवाई करण्यात येईल. अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध असताना नवीन भरतीस मान्यता दिली जाणार नाही. समायोजनास नकार देणाऱ्या किंवा परस्पर भरती करणाऱ्या संस्थांवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल. दिव्यांग कल्याण विभागाच्या नियंत्रणाखालील विशेष शाळा व कार्यशाळांमधील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे विहित मुदतीत समायोजन करण्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर) तसेच आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांची राहणार असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## संपादकीय...

# भीमा कोरेगाव युद्ध

शौर्य, पराक्रम आणि आत्मसन्मानाची गाथा १ जानेवारी १८१८ रोजी भीमा नदीच्या तीरावर असलेल्या कोरेगाव येथे लढले गेलेले भीमा कोरेगावचे युद्ध हे केवळ एक लष्करी संघर्ष नव्हते, तर ते सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारे निर्णायक पर्व ठरले. पुणे शहराच्या वायव्य दिशेला असलेल्या या छोट्याशा गावात घडलेल्या या लढाईने पेशवाईच्या ऱ्हासाला गती दिली आणि शोषित समाजाच्या शौर्याची अमिट नोंद इतिहासात कोरली.

ब्रिटिश बॉम्बे नेटिव्ह लाईट इन्फन्ट्रीच्या पहिल्या रेजिमेंटच्या दुसऱ्या बटालियनमधील अवघ्या सुमारे पाचशे सैनिकांनी–ज्यात बहुसंख्य महार समाजातील होते–कॅप्टन एस. एफ. स्टॉटन यांच्या नेतृत्वाखाली हे युद्ध लढले. अन्न–पाण्यावाचून, कोणतीही विश्रांती न घेता तब्बल बारा तास चाललेल्या या संघर्षात केवळ ५०० पायदळ आणि २५० घोडेस्वारांनी पेशव्यांच्या हजारो पायदळ व घोडदळ असलेल्या सैन्याचा सामना केला. संख्येने प्रचंड असूनही पेशव्यांच्या फौजांनी माघार घेतली आणि या युद्धात ब्रिटिश सैन्याला निर्णायक विजय मिळाला.

या लढाईतील सैनिकांच्या शौर्याची दखल तत्कालीन ब्रिटिश प्रशासनानेही घेतली. पुण्यातील ब्रिटिश रेसिडेंटच्या अहवालात या पराक्रमाचे वर्णन धिरोदात्त शौर्य, अतुलनीय धाडस, अनुशासित निर्भयता आणि समर्पित धैर्य असे करण्यात आले. युद्धात प्राण अर्पण केलेल्या २२ महार सैनिकांची नावे पुढे उभारण्यात आलेल्या विजयस्तंभावर कोरली गेली. हा स्तंभ आजही 'कोरेगाव विजयस्तंभ' म्हणून ओळखला जातो आणि तो महार शौर्याचा मानबिंदू मानला जातो.

भीमा कोरेगावच्या या विजयाचे सामाजिक महत्त्व ओळखणारे अग्रणी नेते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी या लढाईकडे केवळ ब्रिटिश विजय म्हणून न पाहता, शूद्र–अतिशूद्र समाजाच्या आत्मसन्मानाचे प्रतीक म्हणून पाहिले. परकीय सत्तेला मदत करणे भूषणावह नाही, याची जाणीव बाबासाहेबांना होती; परंतु ज्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच नाकारला गेला, अशा समाजासाठी लष्करी प्रवेश हा मुक्तीचा मार्ग ठरू शकतो, हे त्यांनी स्पष्ट केले.

२० मे १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' या पत्रातील अग्रलेखात बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजाच्या पूर्वजांच्या पराक्रमाची आठवण करून दिली. त्यांनी नागेवाडीचा नागनाक महार, खडकीच्या युद्धातील सिदनाक महार, पावनखिंडीतील रायनाक महार यांसारख्या उदाहरणांद्वारे महार समाजाच्या शौर्याची उज्ज्वल परंपरा अधोरेखित केली. इतिहासकारांनी या पराक्रमांकडे दुर्लक्ष केले, ही बाब त्यांनी तीव्र शब्दांत मांडली.

म्हणूनच भीमा कोरेगावची लढाई ही केवळ पेशवे आणि ब्रिटिशांमधील संघर्ष नव्हती, तर ती पेशवाईतील जातीय विषमतेविरुद्धची, अन्यायाविरुद्धची लढाई होती. संधी मिळताच महार सैनिकांनी दाखवलेले शौर्य हे शतकानुशतके चालत आलेल्या सामाजिक अन्यायाला दिलेले उत्तर होते.

आज भीमा कोरेगावचा विजयदिन साजरा करताना हा इतिहास केवळ गौरवासाठी नव्हे, तर बोधासाठी स्मरणात ठेवणे आवश्यक आहे. आपण अन्याय सहन करणाऱ्यांची नव्हे, तर त्याचा प्रतिकार करणाऱ्यांची परंपरा आहोत. जिथे कुठे दुर्बलांवर अन्याय होतो, तिथे भीमसैनिक आजही उभा राहतो–डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेल्या कायद्याच्या मार्गाने न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतो.

या शौर्यदिनाच्या निमित्ताने, भीमा कोरेगावच्या अमर वीरांना मानवंदना आणि त्यांच्या पराक्रमाला विनम्र अभिवादन.

## युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्याकडून बोकनगाव येथील शिंदे परिवाराचे सांत्वन

लातूर - लातूर तालुक्यातील मौजे बोकनगाव येथील हभप



निवृत्ती महाराज शिंदे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने आणि वयोवृद्ध नागेश दादाराव शिंदे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. सदरील निधनाचे वृत्त समजल्याने भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी बोकनगाव येथे जाऊन दोन्ही शिंदे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे बोकनगाव येथे मंगळवारी शिंदे कुटुंबीयांची भेट घेतली. याप्रसंगी शिंदे कुटुंबियातील स्व. निवृत्ती महाराज यांचे चिरंजीव इंद्रजीत शिंदे, भाऊ गिरीधर शिंदे, भागवत शिंदे, माऊली शिंदे तसेच स्व. नागेश शिंदे यांच्या परिवारातील पांडुरंग शिंदे, मुलगा दिनेश शिंदे, बचीरदादा शिंदे इतर अनेक जण होते.यावेळी युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या समवेत भाजपाचे मंडळ अध्यक्ष प्रताप पाटील, पांडुरंग बालवाड, महादेव साळुंके, संजय ठाकूर, हनुमंत गव्हाणे, संजय सावंत व इतर अनेकजण होते. याप्रसंगी बोकनगाव येथील सरपंच दयानंद स्वामी, चेअरमन अजयकुमार शिंदे, भाजपाचे आत्माराम शिंदे, गंगाधर शिंदे, भालचंद्र दाताळ, बालाजी शिंदे, रामचंद्र शिंदे, राजाराम शिंदे, सचिन दाताळ, लक्ष्मण शिंदे व इतर अनेक जण होते.

# कथा: रंगांच्या पलीकडचं दर्शन

संधी आणि साधने सर्वांकडे सारखीच असतात, परंतु एखादे कार्य 'इतिहास' तेव्हाच बनते, जेव्हा त्यामागे निस्वार्थी भावना आणि दूरगामी दृष्टिकोन असतो. हात केवळ कृती करतात, पण इतिहास तोच लिहितो ज्याचा दृष्टिकोन हृदयाशी जोडलेला असतो. ही कथा केवळ तीन चित्रकारांची नसून मानवी दृष्टिकोनाचे दर्शन घडवणारी एक जीवनगाथा आहे. राजकन्या 'कुंचला'च्या रूपाने आपण अशा सत्याचा शोध घेतो, जे केवळ डोळ्यांना नव्हे तर आत्म्याला दिसावे.

एका समृद्ध राज्याचा राजा विरधवल यांना एकुलती एक मुलगी होती– राजकन्या 'कुंचला'. नावाप्रमाणेच तिचे कुंचल्यावर, रंगांवर आणि चित्रांवर अफाट प्रेम होते. बालपणापासून ती चित्रांच्या दुनियेत रमत असे. राजकन्या 'कुंचला' अजाणपणापासूनच रंगांच्या जादुई दुनियेत हरवून जायची. ती केवळ कागदावर चित्र काढत नसे, तर बागेतील फुलांच्या पाकळ्यांतील रंग, पावसाच्या थेंबांतील चमक आणि सायंकाळच्या आकाशातील केशरी छटा न्याहाळण्यात तासन् तास घालवायची. कधी जमिनीवरच्या धुळीत बोटांनी नक्षी काढणे, तर कधी झाडांच्या पानांवरील शिरा अभ्यासणे, यातच तिचे विश्र्व सामावले होते. तिच्यासाठी प्रत्येक रंगाची एक वेगळी भाषा होती आणि प्रत्येक रेषा एक न सांगता येणारी गोष्ट होती.

'कुंचला' चे वय वाढले आणि तारुण्याच्या उंबरठ्यावर येताच कुंचला अचानक अंतर्मुख झाली. तिचे हसणे, बोलणे आणि चित्र काढणेही सुटले. तिच्या डोळ्यांत एक अनामिक दुःख आणि निराशा दाटली होती. काळजीपोटी राजाने तिला विचारले, बाळा, तुला काय हवे? कशाने तुझे हे दुःख दूर होईल? कुंचला शांतपणे म्हणाली, बाबा, मला जगातील सर्वात 'सर्वोत्तम' चित्र पाहायचे आहे. असे चित्र जे केवळ डोळ्यांनाच नाही, तर माझ्या आत्म्याला स्पर्श करेल. जोपर्यंत मला ते चित्र मिळत नाही, तोपर्यंत माझ्या मनातील ही मरगळ दूर होणार नाही.

राजाने संपूर्ण राज्यात दवंडी पिटवली. हजारो चित्रकार आपली सर्वोत्कृष्ट चित्रे घेऊन दरबारात आले. कुंचला प्रत्येक चित्र पाहत असे, पण तिची नजर काहीतरी वेगळेच शोधत होती. शेवटी राजाने स्वतः तीन प्रसिद्ध चित्रकारांची निवड केली आणि त्यांची चित्रे कुंचलेसमोर मांडली.



पहिल्या चित्रकाराने एक भव्य चित्र आणले होते. ते तांत्रिकदृष्ट्या अतिशय अचूक होते. सोन्याच्या चौकटीत मढवलेले ते चित्र पाहताच राजाला वाटले की हेच सर्वोत्तम असावे. पहिल्या चित्रकाराने आपले चित्र राजकन्येला आवडावे, यापेक्षा ते राजाला कसे 'प्रभावित' करेल याचाच विचार जास्त केला होता. त्याने विचार केला की, जर मी तांत्रिकदृष्ट्या बिनचूक रेषा काढल्या आणि महागड्या रंगांचा वापर करून चित्र सोन्याच्या चौकटीत मढवले, तर त्याची 'राजेशाही किंमत' आपोआप वाढेल. त्याचा दृष्टीकोन केवळ व्यवहार आणि प्रदर्शनावर आधारित होता. त्याने राजकन्येच्या मनातील भावनेपेक्षा राजदरबारातील प्रतिष्ठेचा आणि चित्राच्या संभाव्य किमतीचा विचार करून ते चित्र केवळ एक 'उत्कृष्ट वस्तू' म्हणून साकारले होते.

त्या चित्राकडे क्षणभर पाहिले आणि नजर वळवली कुंचला म्हणाली, बाबा, यात कौशल्य आहे पण प्राण नाही. या चित्रकाराने हे चित्र काढताना रंगांच्या किमतीचा आणि बाजाराचा विचार केला आहे. हे चित्र 'विकण्यासाठी' आहे, 'जगण्यासाठी' नाही. हे केवळ कागदावरचे ओझे आहे.

दुसऱ्या चित्रकाराने असा विचार केला की, राजकन्या निराश आहे, म्हणून तिला 'आनंद' देणारे दृश्य समोर मांडावे. त्याने मनाशी ठरवले की, निसर्गातील सर्वात मोहक रंग आणि फुलांची उधळण पाहून कुंचला क्षणभर तिचे दुःख विसरेल. त्याचा पूर्ण कल केवळ 'बाह्य सौंदर्यावर' आणि डोळ्यांना सुखावणाऱ्या चकचकीतपणावर होता. त्याला वाटले की, चित्रातील रंगांचा हा 'लेप' राजकन्येच्या मनातील अंधार दूर करेल, पण दुर्दैवाने त्याने केवळ वरवरच्या आकर्षणाचा विचार केला, त्यातील खोलवरच्या भावनेचा नाही. दुसऱ्या चित्रकाराने नंदनवनाचे चित्र काढले होते. रंगांची उधळण, सुंदर फुले आणि मोहक निसर्ग त्यात होता. राजाला ते खूप सुखावह वाटले.

कुंचला चित्र पाहताच म्हणाली, हे चित्र केवळ डोळ्यांना फसवणारे आहे. हे एक सुंदर आवरण आहे, पण त्यापलीकडे काहीही नाही. हे चित्र माझ्या घराची भिंत सजवू शकेल, पण माझ्या मनातील पोकळी भरू शकणार नाही. सौंदर्याचा हा लेप कालांतराने फिका पडेल.

तिसऱ्या चित्रकाराने एक साधे, थोडे विस्कटलेले आणि वरवर पाहता 'अपूर्ण' वाटणारे चित्र समोर ठेवले. त्या चित्रात एक म्हातारी आजी एका लहान मुलाचा हात धरून क्षितिजाकडे पाहत होती. रंगांचा कोणताही डामडौल नव्हता, पण त्या रंगांच्या फटकाऱ्यात एक अनामिक ओढ होती.तिसऱ्या चित्रकाराने असा विचार केला की, राजकन्येचे दुःख दूर करण्यासाठी रंगांच्या चकचकीतपणापेक्षा 'जिव्हाळ्याचा ओलावा' अधिक महत्त्वाचा आहे. त्याने चित्रात एखादे वैभवशाली दृश्य न मांडता, मानवी नात्यांमधील हळवेपण आणि संघर्षातून जन्मलेले 'सत्य' मांडायचे ठरवले. त्याचा उद्देश चित्र विकणे किंवा सजवणे हा नव्हता, तर राजकन्येच्या एकाकी मनाशी 'संवाद' साधणे हा होता. त्याने स्वतःचे अनुभव आणि वेदना रंगात मिसळल्या, जेणेकरून ते चित्र केवळ एक दृश्य न राहता काळजाला भिडणारी एक जिवंत कविता बनावे.

ते चित्र पाहताच राजकन्या कुंचला शहारली. तिच्या डोळ्यांतून घळघळ पाणी वाहू लागले. तिने त्या चित्राला स्पर्श केला आणि ती पहिल्यांदाच मनापासून हसली. राजा चक्रावून गेला. त्याने विचारले, बाळा, या साध्या चित्रात तुला असं काय दिसलं?

कुंचला भावूक होऊन म्हणाली, बाबा, या चित्रात चित्रकाराने रंग नाही, तर स्वतःचे अश्रू आणि माया सांडली आहे. या चित्रात मला 'आईचं थकलेलं हसू' आणि 'पावसात भिजलेली लहानगी पावलं' दिसत आहेत. या चित्रातील तुटलेल्या रेषांमध्ये जीवनाचा संघर्ष आहे आणि विस्कटलेल्या रंगांमध्ये अथांग प्रेम आहे. हे चित्र माझ्याशी संवाद साधतंय!

राजा विरधवल यांनी त्या तिसऱ्या चित्रकाराला बोलावले आणि विचारले, तुझ्या चित्रात अशी काय जादू आहे? चित्रकार नम्रपणे म्हणाला, महाराज, पहिले दोन चित्रकार 'हात' आणि 'मेंदू' ने काम करत होते. मी मात्र हे चित्र 'हृदयाने' जगलो होतो. जोपर्यंत आपण स्वतः दुःखाचा अनुभव घेत नाही, तोपर्यंत आपण दुसऱ्याचे दुःख पुसू शकत नाही. राजाने त्या चित्रकाराला सुवर्णमोहोरांनी सन्मानित केले आणि राजकन्या कुंचला पुन्हा आनंदी झाली.

**राहूल हरीभाऊ इंगळे पाटील - मोबाइल - ९८९०५७७१२८**

# एकत्र कुटुंब व्यवस्था संपणार आहे?

आधुनिक तंत्रज्ञान झपाट्याने प्रगती करीत असतांना एकत्र कुटुंब व्यवस्था संपत चालली आहे. याचा गांभीर्याने .विचार करावाच लागेल.येणार्या वीस पंचवीस वर्षांत नसुन येत्या २०३५ वर्षात आपल्या घरातील काही नाती ही कायम साठी संपणार आहेत.विसावे शतक संपत असतांना एकविसाव्या शतकात भयंकर काही घडणार आहे असे सांगणारे संत बाबा,महाराज,ज्योतिषी खूप भविष्यवाणी करत होते.२०२२/२०२३ करोंनाने जगात कसा धुमाकूळ घातला होता.त्यामुळे भावाला वैरी समजणारा भाऊ,आणि अनेक कुटुंबातील संपलेले नाते नव्याने जोडल्या गेले होते.त्यात दादा, वहीनी,दीर,छोटी जाऊ,मोठा भाऊ जेठ,मोठी जेठानी जाऊ, काका,काकी ,नणंद,नंदई,आत्या,मामा,मावशी,मावस ा,(काका),ताई,दाजी या सहीत अनेक नाती आमच्या घरातून संपलेली नाती जोडले गेले होते.आता २०३५ पर्यन्त ती आचारणातून संपण्याची सुरुवात झाली आहे.

सुशिक्षित,उच्चशिक्षित पदवीधर मुली आपल्या मानसिकते मुळे फक्त अडीच तीन माणसांचा परीवार शिल्लक ठेवणार आहेत.त्यांना हिंमत देणारा मोठा भाऊ नको आहे.ना हुशार,चुणचुणीत असा छोटा भाऊ नको आहे.आणि सासू सासरे तर बिलकुल नको आहेत. ही शिकवण उच्च शिक्षित आई वडिलांची न्यायमूर्ती असणाऱ्या माणसांची असेल तर एकत्र कुटुंब व्यवस्थेत कोण असणार आहे?. म्हणूनच मी लिहत आहे की एकत्र कुटुंब व्यवस्था संपणार आहे?.

एकत्र कुटुंब व्यवस्थेत काय असते?. घरात वहीनी असते,कोणी छोटा दीर असतो,सूना सुद्धा असतात,तिला कोणी जाऊ असतात,कोणी खट्याळ नणंद असतात,चलाख, चपळ आत्या असतात.आता नवीन काय?.एकूणच काय तर,एकच मुल ही फॅशन आणि फक्त मी मी पणाची मूर्खता आणि अज्ञानता स्पष्टपणे दिसत आहे.त्यात परीवार संपत आहेत.दोन भावांचे परीवार सुद्धा आता शेवटच्या टप्प्यावर आहेत. आधी मातीच्या कच्च्या घरात सुद्धा मोठमोठे परीवार राहात होते.आता मोठमोठ्या बंगल्यात केवळ अडीच तीन राहाण्याची फॅशन आली आहे. हे सर्व पाहून मनाला फारच वेदना होत आहेत.या अशा परिस्थितीत आम्ही एकुलत्या एका मुलावर काय काय जबाबदारी देऊ शकतो.त्याला कठीण प्रसंगी बळ,हिंमत कोण देणार?. भाऊ नसल्यावर त्याच्या खांद्यावर मदतीचा हात कोण ठेवणार?. म्हणजेच की एकत्र कुटुंब व्यवस्था संपणार आहे?.

आपली लोकसंख्या कमी का होत आहे.आपली कमी होत असलेली लोकसंख्या हा एक चिंतेचा विषय होत आहे.आपल्याला आपली मानसिकता बदलावाच लागणार आहे.कशी ते पहा मुलगी व मुलगीचे आई वडील मुलगा पाहतांना त्याला सरकारी नोकरी पाहिजे,स्वतचा टू बी एच के पाहिजे.फोरव्हीलर गाडी पाहिजे.घरात भाऊ, बहीण,सासू सासरे नको आहेत. या अटी पूर्ण करणार मुलगा मिळत नाही त्यात मुलीचे व मुलांचे वय वाढत जाते.एकतर व्यसन लागते,एकलकोंडया स्वभाव,विचार करण्याची मानसिकता पूर्णपणे बदलते यात ३२ ते ३८ वय होते. तडजोड करून लग्न झाले तर पुढे ते टिकेल याची हमी नसते.मग मूल जन्मा येण्याचा प्रश्नच येत नाही. म्हणूनच मी लिहत आहे की एकत्र कुटुंब व्यवस्था संपणार आहे?.पूर्वी १८ ते २० वयात मुलामुलीचे लग्न केले जात होते.घर,स्वभाव,खानदान पाहिले जात होते.ग्रामीण भागातील मूलमुली शेतात कष्टाची कामे करून सुखाने संसार करतात आणि आई वडिलांना सांबाळतात.उच्चशिक्षित पदवीधर मूल,मुली स्वताचे विकास आई,वडिलांना लांब किंवा वृद्धाश्रमात ठेवतात.म्हणूनच मुलांच्या लग्नाचे वय २० ते २४ पर्यंत निश्र्चित केले पाहीजे.घरदार,खानदान,स्वभाव आणि सामाजिक बांधिलकी,लोक लज्जा असणारी मानसिकता पाहिली पाहिजे.ते न पाहता केवळ सरकारी नोकरी, स्वतचा टू बी एच के,फोरव्हीलर गाडी पाहून लग्न केले तर सुख,समाधान,जिव्हाळा जास्त काळ टिकत नाही.म्हणूनच एकत्र कुटुंब व्यवस्था पण टिकत नाही.

उच्चशिक्षित पदवीधर मूल,मुली त्यांचे आई वडील सेटल होण्याच्या मानसिकता ठेऊन किंवा नादात मुलामुलीचे वय ३० ते ३५ पर्यंत ढकलले जात आहे. यातच जवळ जवळ एका पिढीचे अंतर पडत आहे. उच्चशिक्षित पदवीधर मूल,मुली सेटल होऊन यशस्वी होतात,पण तोपर्यंत वयात असणारा हुरुप व अर्धे आयुष्य निघून गेलेले असते.वयामुळे विचार करण्याची मानसिकता बदलत जाते. कोणी बोलणारा विचारणारा राहत नाही. हे शल्य कुठे तरी जाणवते.पण बोलता येत नाही. एकत्र कुटुंब असते तर सर्वच हक्काने सांगता,बोलता आले असते. आज ती एकत्र कुटुंब समाज व्यवस्था कोण संपवत आहे?.

गावात गावकी आणि भावकी सर्व सुख दुखात सहभागी असते,काही उत्सव सर्वांना एकत्र आणण्यासाठीच असतात. हे उच्चशिक्षित पदवीधर मूल,मुली हम दो हमारा एक च्या नादात विसरत चालले आहे.सर्वात महत्वाचे म्हणजे हम दो...हमारा एक अशी कुटुंब व्यवस्था केल्यामुळे.गावी कोण लक्ष देणार,मग गावचे घर बंद.सणा सुदीला सुद्धा जायला मिळेल की नाही.याची खात्रीच देता येत नाही.कारण इकडे मुंबईला हम दो हे कामावर असणार व हमारा एक हा स्वतःच्या करिअर मध्ये गुंतलेला असणार त्याला गावकी भावकीचे महत्व कसे कळणार?.

देशात आधुनिक तत्वज्ञान झपाट्याने येत असले तरी हे एक विदारक सत्य नाकारता येत नाही.म्हणून आपली कुटुंब वाढली पाहिजेत.कोणाला पटो अथवा न पटो.पण आपल्या पूर्वज यांनी जी एकत्र कुटुंब व्यवस्था अवलंबीली होती ना.तीच शंभर टक्के बरोबर होती. उच्चशिक्षित पदवीधर मूल,मुलीनी त्यांच्या आई वडिलांनी आपली मानसिकता बदली करून मैत्री भावना वाढवली पाहिजे. समाजात सामाजिक बांधिलकी ठेऊन वागळे पाहिजे. तरच एकत्र कुटुंब समाज व्यवस्था संपणार नाही.२०२५ संपले कसे कळले नाही. पण २०२६ कसे असावे हे आपण एकत्र बसून ठरवले पाहिजे.अन्यता सर्वच दिवस सारखेच असणार आहेत.नवीन वर्षात एकत्र कुटुंब समाज व्यवस्था संपणार नाही तर ती निर्माण होण्यासाठी आपण काही तरी केले पाहिजे.हीच अपेक्षा ठेवून नवीन वर्षाच्या सर्व लोकप्रिय दैनिकाच्या वाचकांना हार्दिक शुभेच्छा देतो.व थांबतो.

जय भारत,जय संविधान.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.**

# बुलढाणा अर्बन बँकेच्या केज शाखेत रात्री ठेवीदारांची गर्दी

केज/प्रतिनिधी-केज शहरातील पोलिस प्रशासनास पाचारण करून



बुलढाणा अर्बन बँकेच्या शाखेत काल रात्री उशिरापर्यंत ठेवीदारांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

पोलिस बंदोबस्तात ठेवीदारांची ठेवी देण्यासाठी बँक रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

बँक बंद पडणार ही आफवा खरी खरी का खोटे हे मात्र नागरिकांना समजु शकले नाही अथवा बँकेच्या अधिकारी कर्मचारी यांनी अधिकृत पणे तशी काही माहिति दिली नाही.

काल रात्री ठेवीदारांना अचानक बुलढाणा अर्बन बँक बंद पडणार असल्याचे समजताच ठेवीदारांनी गर्दी केली यावेळी अचानक समोर गर्दी झालेली दिसताच ठेवीदारांना ठेवी देण्यासाठी बँक रात्री उशिरापर्यंत सुरू होती रात्री बँक किती वाजेपर्यंत सुरू राहणार हे मात्र समजू शकले नाही परंतू ठेवीदारांची गर्दी वाढत चालली होती. बँक बंद होणार अशी चर्चा केज शहरात वाऱ्याचे वेगाने पसरली होती त्यामुळे ठेवी दारात भीतीचे वातावरण पसरले होते. ठेवीदारांना विश्र्वासात घेऊन माहिती देणे हे बँक अधिकारी कर्मचाऱ्यांचे काम होते परंतु त्यांनी ठेवीदार व नागरिकांना कसल्याच प्रकारचे अधिकृत माहिती दिली नाही असे ठेवेदार व नागरिकात बोलले जात होते त्यामुळे जनसामान्यात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केज टाकळी शिव रस्ता मोकळा करुन दिल्याने शेतकरी झाले आनंदी



केज/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असणारे पाणंद रस्ते व शिव रस्ते हे मोकळे करण्यासाठी केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी अनेक गावात ही मोहिम राबवून अडथळा आणणाऱ्या शेतकऱ्यांना समजावून सांगत केज टाकळी हा शिव रस्ता सोमवार दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी मोकळा करुन दिल्याने या रस्त्यावरील शेतकरी बांधव आनंदी झाल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र राज्याच्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या पावसाळी अधिवेशनात शेक-यांना येजा करण्यासाठी पाणंद रस्ते व शिव रस्ते मोकळे करण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे नियोजन जाहीर केले, या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली होती. शासनाच्या या निर्णयाचे पालण करत केज तालुक्यातील टाकळी शिवारातील राज्यमार्गा पासुन दक्षिण उत्तर जात असलेला केज ते टाकळी हा शिव रस्ता सर्वे नंबर १०७,१०८ व केज शिवारातील सर्वे नंबर ४८ मधून शिव रस्ता पुढे चिंचोलीमाळी,नांदूर घाट रोडला जोडला जाणारा रस्ता हा गेल्या पन्नास वर्षापासून काही शेतक-यांनी या रस्त्याच्या आजबाजूने अतिक्रमण केल्याने हा रस्ता अरुंद झाल्याने या रस्त्यावरून जाणा-या व येणा-या

शेतक-यांना शेतात आपले वाहण घेऊन जाणे मोठे आवघड झाले होते.त्यामुळे या शिव रस्त्यावरील काही शेतक-यांनी शासनाने काही दिवसापूर्वी शिव रस्ता व पाणंद रस्ता संदर्भात काढलेला शासन निर्णय केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांना दाखवून हा शिव रस्ता शेतक-यांसाठी मोकळा करुन देण्याची मागणी केली होती.मंडळ अधिकारी व तलाठी यांनी या शिव रस्त्याचा पंचनामा करुन सदरील अहवाल हा केज तहसील कार्यालयात सादर केल्यानंतर केजचे कर्तव्यदक्ष तहसीलदार राकेश गिड्डे हे दि.२९ डिसेंबर सोमवार रोजी महसुलचे कर्मचारी व मंडळ अधिकारी भालेराव,

तलाठी इनामदार यांना सोबत घेऊन शिव रस्त्याची पाहणी केली.

यावेळी उपस्थित असलेल्या शेक-यांने शासन निर्णाची माहीती सांगून हा शिव रस्ता मोकळा करुन दिला.यावेळी टाकळीचे सरपंच आनंत घुले,ग्रा.प.सदस्य सुरेश घुले, शेतकरी रमाकांत बापू मुंडे,

यांच्यासह अनेक शेतकरी यावेळी उपस्थित होते. हा शिव रस्ता मोकळा करुन दिल्याने या शिवरस्त्यावरील शेतक-यांना मोठा आनंद झाला.हा शिवरस्ता केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी मोकळा करुन दिल्याने त्यांचे भागातील शेतक-यांनी धन्यवाद मानले आहे.

# निवडणूक निरीक्षक डॉ.मैनक घोष यांच्याकडून पाहणी,निवडणूक पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना

लातूर/प्रतिनिधी: लातूर मनपा निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडून नियुक्त करण्यात आलेले निरीक्षक तथा धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष यांनी मंगळवारी (दि. ३०) लातूर येथे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांना भेटी देऊन पाहणी केली. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याच्या सूचना त्यांनी केल्या. निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांनी मुख्यालयात बैठकही घेतली.



मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. मंगळवारी त्यांनी लातूर येथे भेट दिली.शहरात स्थापन करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांना भेटी दिल्या. तहसील समोरील उपविभागीय अधिकारी कार्यालय, औसा रस्त्यावरील नंदी स्टॉप, ठाकरे चौक तसेच शिवनेरी गेट समोरील समाज कल्याण कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांना त्यांनी भेटी दिल्या.मंगळवारी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता.त्यामुळे चारही कार्यालयात मोठी गर्दी होती. या ठिकाणी पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले.

लातूर मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रीमती मानसी, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, उपायुक्त वसुधा फड यांचीही त्यांच्यासमवेत उपस्थिती होती.

कार्यालयांची पाहणी केल्यानंतर डॉ.मैनक घोष यांनी मनपा मुख्यालयात निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांची बैठकही घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.मैनक घोष म्हणाले की, मनपा निवडणूक पारदर्शक पद्धतीने पार पाडावी. आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे. निवडणुकीच्या काळात कुठले गैरप्रकार होऊ नयेत याची काळजी घ्यावी. उमेदवारांकडून प्रलोभने दाखविली जात असल्याचे निष्पन्न झाले तर त्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

बुधवारी उमेदवारी अर्जाची छाननी होणार आहे. यावेळी निवडणूक निरीक्षक उपलब्ध राहणार आहेत.

# कडाक्याच्या थंडीत माणुसकीचे ऊबदार पांघरून,युवा माहेश्र्वरी समाज लातूरकडून ५०० गरम शालींचे गरजू रुग्णांना घातल्या पांघरून



लातूर :समाजातील गरजू घटकांच्या दुःखावर मायेची फुंकर घालण्याचे कार्य युवा माहेश्र्वरी समाज लातूरने पुन्हा एकदा करून दाखवले आहे. कडाक्याच्या थंडीने सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना, उपचारासाठी रुग्णालयात दाखल असलेल्या गरीब रुग्णांच्या वेदना ओळखून युवा माहेश्र्वरी समाजाच्या युवकांनी माणुसकीचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचार घेत असलेल्या गरजू व गरीब रुग्णांना थंडीपासून संरक्षण मिळावे, यासाठी युवा माहेश्र्वरी समाज लातूरच्या वतीने तब्बल ५०० गरम शालींचे पांघरून घालण्यात आले. थंडीने कुडकुडणाऱ्या रुग्णांच्या चेहऱ्यावर यामुळे दिलासा आणि समाधान दिसून आले.

लातूर शहरातील युवक एकत्र येऊन स्थापन केलेल्या युवा माहेश्र्वरी समाज संघटनेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. समाजकार्य ही केवळ जबाबदारी नसून ती संवेदनशीलतेतून येणारी सेवा आहे, हे या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

या सामाजिक उपक्रमावेळी युवा माहेश्र्वरी समाज संघटनेचे अध्यक्ष निकुंज भूतडा, सचिव ड. योगेश मालपाणी, तसेच देव भूतडा, देवेंद्र काबरा, ओंकार चरखा, कृष्णा सोनी, रितेश रांदड, केशव बियाणी, शिवम भूतडा, श्याम यादव, जोशी आदी पदाधिकारी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून रुग्णांना प्रत्यक्ष पांघरून घालून त्यांना मानसिक आधार देत माणुसकीचा संदेश दिला.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवणे, हीच खरी समाजसेवा आहे, अशी भावना यावेळी उपस्थित युवकांनी व्यक्त केली. युवा माहेश्र्वरी समाजाच्या या स्तुत्य उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून, अनेक सामाजिक संघटनांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

# माझ्या बोलीभाषेची महानता आणि मराठी भाषेतील योगदान या विषयावर राज्यस्तरीय लेख स्पर्धा

मुंबई- बहुतेक प्रमुख भाषांप्रमाणेच मराठी भाषाही एकाहून अधिक पद्धतींनी बोलली जाते. मराठी या मुख्य भाषेशी नाते कायम ठेवलेली, तिची बोलीभाषा दर १२ कोसांगणिक उच्चारांत, शब्दसंग्रहांत, व वाक्प्रचारांत बदलत रहाते. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती एक संस्कृती आहे. तिच्या मातीत असंख्य उपभाषांचे, बोलींचे रोप बहरलेले आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांत बोलीभाषांचे वैविध्य आढळते. बोली भाषेतील विविधतेमुळे मराठी भाषेची ताकद वाढली असून तिचे सौंदर्य अधिक खुलले आहे. या बोलीभाषांमधील साहित्य, लोकसंस्कृती, गाणी, नाटकं, प्रवचनं यांनी मराठीला अधिक व्यापक आणि जिवंत बनवले आहे. मराठी भाषा ही समुद्र आहे तर तिच्यात मिसळणाऱ्या बोलीभाषा या विविध नद्यांप्रमाणे आपले भाषिक सौंदर्य तिच्यामध्ये कायम मिसळत राहते. हा ओघ असाच कायम असणे खूप गरजेचे आहे. शब्दांचे वैशिष्ट्य, शब्दांचा गोडवा, शब्दांचे अर्थ, त्याची आशयघनता, काळाच्या गतीमध्ये लुप्त होऊ नये.मराठी भाषेच्या अनेक बोलीभाषा आहेत, ज्या भौगोलिक प्रदेशानुसार बदलतात, जसे की विदर्भात वऱ्हाडी, नागपुरी; कोकणात मालवणी, कोकणी, आगरी; पश्र्चिम महाराष्ट्रात कोल्हापुरी, पुणेरी; आणि खानदेशात अहिराणी, खानदेशी यांसारख्या बोलीभाषांचा समावेश होतो, ज्या शब्दसंग्रह आणि उच्चारात वेगळेपण दर्शवतात पण लेखनात प्रमाण मराठीचा वापर होतो. आजही मराठी भाषेच्या जडणघडणीत या बोलीभाषांचा मोलाचा वाटा आहे. बोलीभाषांचे संवर्धन आणि त्यांचे लेखन-साहित्यिक योगदान पुढे नेणे, हे मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक आहे.




मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत कामगारनेते वसंतराव होशिंग स्मृती राज्यस्तरीय लेख स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचा विषय माझ्या बोलीभाषेची महानता आणि मराठी भाषेतील योगदान हा विषय असून शब्दसंख्या १५०० आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्यांनी स्व-बोलीभाषेचा अधिकाधिक वापर करून मराठी साहित्य आणि चित्रपट-नाट्यकलाकृतील योगदानाचा सविस्तर आढावा घेऊन हा लेख लिहून पाठवावा. लेख सुवाच्च अक्षरात लिहून किंवा देवनागरी फॉन्टमध्ये टाईप करून ९१६७३६४८७० यावर दिनांक ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पाठवावा, पारितोषिक वितरण समारंभ कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जन्मदिन मराठी भाषा दिवस साजरा करण्यात येणार त्या कार्यक्रमात होणार आहे असे आवाहन स्पर्धा प्रमुख सुनील कुवरे यांनी केले आहे.

# पारदर्शक व भयमुक्त वातावरणात निवडणूक पार पाडणे करीता आचारसंहिता कक्षाकडुन संपर्क क्रमांक प्रसिध्द विविध पथके कार्यान्वित

लातूर/प्रतिनिधी: लातूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर झाला असून निवडणुकीची आचारसंहिता लागु झाली आहे .निवडणूक अधिकारी तथा आयुक्त,श्रीमती मानसी यांचे आदेशानुसार आचार संहिता कक्ष प्रमुख म्हणून श्रीमती आम्रपाली कासोदेकर उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शहरातील मध्यवर्ती ठिकाणी महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालय - ड गांधी चौक येथे आचार संहिता कक्ष कार्यन्वित करण्यात आला आहे.लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ भयमुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याचा दृष्टीकोनातून आचार संहिता कक्षा अंतर्गत विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. शहरातील प्रवेश करणा-या पाच प्रमुख मार्गावर



१. वासनगाव पाटी , औसा रोड

२.बोरवटी पेट्रोल पंप,अंबाजोगाई रोड

३.रेल्वे उडडाण पुल,बार्शी रोड,

४.शेतकी शाळा,नांदेड रोड

५. पोलीस क्वार्टर बाभळगाव रोड, लातूर

असे एकूण ५ स्थिर सर्वेक्षण पथके (३ सत्रामध्ये २४ तास) कार्यान्वीत करण्यात आली असुन शहरात दाखल होणा-या वाहनाची कसुन तपासणी करण्यात येत आहे .तसेच लातूर शहर महानगरपालिका,लातूर सार्वत्रिक निवडणूक,लातूर हद्दीमध्ये मा.निवडणूक निर्णय अधिकारी निहाय ६ भरारी पथके , विमानतळ येथे १ भरारी पथक असे एकूण ७ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तडढ (चित्रीकरण सर्वेक्षण पथक) च्या माध्यमातुन प्रत्येक प्रभागातुन होणा-या सभा व मिरवणुक व प्रचाराच्या अनुषंगाने प्रत्येक बाबीचे चित्रीकरण या १२ पथकांमार्फत करण्यात येणार आहे.तसेच या सर्व चित्रीकरण तपासणीसाठी ८ (ततढ) चित्रीकरण तपासणी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नागरीकांच्या आचारसंहिता संबधित तक्रारी निवारण करीता नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. त्याचा क्ष्श्रश्रिळपश छे. ०२३८२-२५१३११ हा असुन , आचार संहिता कक्षात कार्यरत असणा-या अधिका-याकडेही तक्रार नोंदविण्यासाठी

१.श्री.रवी कांबळे,- मो.नं ९९७०९६४४५३

२.श्री.निलेश सोमाणी मो.नं -७७२०८९७७७७,

३.श्री विष्णू पोलकर -मो.नं ७९७२२७४८८५,

४. श्री.लक्ष्मण जाधव मो.नं - ९८५०२०३२११

या संपर्क क्रमांकावरती संपर्क साधून तक्रार निवारण केले जाईल.

